मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ‘फार्मर्स स्ट्रीट’ उपक्रमास नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

## पिंपरी चिंचवडकरांनी घेतला सेंद्रिय उत्पादनांचा आस्वाद : पालिकेच्या उद्यान विभागाच्या वतीने उपक्रमाचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्थानिक शेतकरी, नर्सरी यासोबतच फुड प्रोसेसिंग कंपन्यांना पाठिंबा देण्यासाठी, शाश्वत पद्धतींचा प्रसार करण्यासाठी आणि निसर्गसंपत्तीच्या समृद्धतेचा उत्सव साजरा करण्यासाठी महापालिकेच्या उद्यान विभागाच्या वतीने फार्मर्स स्ट्रीट या दोन दिवसीय उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा केवळ उपक्रम नसून ग्राहक आणि उत्पादक यांच्यातील नाते दृढ करण्याचा आणि शहरातील स्थानिक कृषी, व्यापारी समुदायाच्या उपजीविकेला पाठिंबा देण्याचा एक महत्वाकांक्षी प्रयत्न आहे, असे प्रतिपादन आयुक्त शेखर सिंह यांनी केले.



पिंपरी चिंचवड महानगरपालिका उद्यान विभाग व मेसर्स पुणे अर्बनली संस्थेच्या वतीने पिंपळे सौदागर येथील लिनिअर गार्डन येथे ‘फार्मर स्ट्रीट’ चे आयोजन ४ व ५ जानेवारी रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते आज झाले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उद्यान व वृक्ष संवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, उद्यान अधिक्षक राजेश वसावे आदी उपस्थित होते.

लिनीअर गार्डन येथे भरविण्यात आलेल्या फार्मर्स स्ट्रीटवर शेतकऱ्यांकडून व रोपवाटिकांकडून थेट आणलेले नैसर्गिक आणि सेंद्रिय फळे, भाजीपाला, कृषी उत्पादने आणि हातकाम केलेल्या वस्तुंचे प्रदर्शन नागरिकांना पाहायला मिळणार आहे. याशिवाय, नैसर्गिक सौंदर्यप्रसाधने आणि प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांचे स्टॉल्स देखील येथे लावण्यात आले आहेत ज्याला नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

दरम्यान, आज सकाळी पिंपळेसौदागर येथील मल्टीफिट आणि मार्वेल या व्यायामशाळेतील प्रशिक्षकांनी फार्मर्स स्ट्रीट येथे नागरिकांसाठी मोफत झुंबा सेशन्स घेतले ज्याला नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद दर्शविला. शिवाय, संध्याकाळी मावळा ग्रुपतर्फे लहान मुलांसाठी ‘रणांगण’ नावाच्या खेळाचेही आयोजन केले जाणार आहे, ज्यामध्ये मुलांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील युद्धकौशल्यांचे मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे.

४ जानेवारी रोजी म्हणजे शेवटच्या दिवशी सकाळी नागरिकांसाठी मोफत योगा, ड्रम सर्कल व लाईव्ह सिंगिंगच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून रात्री या उपक्रमाचा समारोप आमदार शंकर जगताप आणि आयुक्त शेखर सिंह यांच्या उपस्थितीत होणार आहे.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या उद्यान विभागाने उत्पादक ते ग्राहक यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी राबविलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे. या उपक्रमामुळे आमच्यासारख्या स्थानिक व्यापाऱ्यांची उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्यास मदत मिळाली असून त्यांचाही या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळत आहे. यापुढेही असे उपक्रम राबविले जावेत अशी आमची इच्छा आहे.
> **- अमित सराफ, स्टॉलधारक, अनुस किचन.**

> नैसर्गिक आणि सेंद्रिय उत्पादनांबद्दल नागरिकांचा असलेला उत्साह पाहून आनंद वाटला. महापालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या अशा उपक्रमांमुळे आम्हाला केवळ आर्थिक मदत होत नाही तर नैसर्गिक शेती आणि उत्पादन पद्धती अवलंबण्याची प्रेरणाही मिळते.
> **- शोभा राजळे, स्टॉलधारक, गुडवन सेंद्रिय गुळ.**

# पिंपरी-चिंचवड महापालिकेस या वर्षात 25 सार्वजनिक सुट्या

## जानेवारी, जून व जुलै तसेच, सप्टेंबर, नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात प्रत्येकी एकच सार्वजनिक सुटी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेस २०२५ या नव्या वर्षात तब्बल २५ सार्वजनिक सुट्या देण्यात आल्या आहेत. त्यामुळे त्या दिवशी महापालिकेचे कामकाज पूर्णपणे बंद असणार आहे. या सुट्याप्रमाणे अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपल्या रजेचे नियोजन करता येणार आहे. जानेवारी, जून व जुलै तसेच, सप्टेंबर, नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात प्रत्येकी एकच सार्वजनिक सुटी आहे.




महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक मध्ये उपविभाग, सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचनेद्वारे २०२५ मधील सार्वजनिक सुट्या जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यात फेब्रुवारी महिन्यात २, मार्चमध्ये ३, एप्रिलमध्ये ४, मे महिन्यात २ सुटी आहेत. ऑगस्टमध्ये ३, ऑक्टोबर महिन्यात ५ सार्वजनिक सुटी आहेत.

तसेच, दर आठवड्याच्या शनिवारी व रविवारी महापालिकेस साप्ताहिक सुटी असते. त्यामुळे महापालिकेचे कामकाज बंद असते. या २५ सार्वजनिक सुट्या महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आल्या आहेत. तसे परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त विठ्ठल जोशी यांनी काढले आहे. दरम्यान २६ जानेवारीची सुटी रविवारी आली आहे. त्यामुळे सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना सुटीदिवशी कार्यालयात यावे लागणार आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लष्कराच्या प्रदर्शनाचे उद्घाटन

## रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब अर्थात रेसकोर्स येथे आयोजित 'नो युअर आर्मी' या प्रदर्शनाचे उद्घाटन

**पुणे | प्रतिनिधी**

आकाशात घोंघावणारे ड्रोन, मल्लखांबावर चित्तथरारक कसरती, रोबोटिक म्यूल आणि लष्कराचे प्रशिक्षित श्वान, कलरीपयट्टू-मार्शल आर्ट्सच्या लक्षवेधक सादरीकरणाला मिळालेली दाद... हेलिकॉप्टरनी दिलेली सलामी... बंदुका, रणगाडे, क्षेपणास्त्र प्रक्षेपक अशी लष्करी सामग्री पाहण्यासाठी झालेली गर्दी... अशा वातावरणात 'नो युवर आर्मी' हे प्रदर्शन सुरू झाले.



भारतीय लष्कराचा 'आर्मी डे परेड' कार्यक्रम १५ जानेवारी रोजी होणार आहे. या निमित्ताने लष्कराच्या दक्षिण मुख्यालयातर्फे रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब अर्थात रेसकोर्स येथे आयोजित 'नो युअर आर्मी' या प्रदर्शनाचे उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते झाले. दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ, खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, आमदार सुनील कांबळे, उद्योजक पुनीत बालन या वेळी उपस्थित होते. हे प्रदर्शन रविवारपर्यंत विनामूल्य खुले राहणार आहे.

'लष्कराचे प्रदर्शन उत्तम आहे. इतके वैविध्यपूर्ण सादरीकरण पाहण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे लष्कराच्या सामर्थ्याचा अनुभव प्रत्यक्ष घेता येत आहे,' असे ससून रुग्णालयात अंतिम प्रशिक्षण घेत असलेला डॉ. सिद्धिकेश तोडकर याने सांगितले. तर सहावीत शिकणारा शौर्य वाकोडे म्हणाला, 'लष्कराच्या जवानांनी केलेले सादरीकरण खूप आवडले. असे प्रदर्शन पहिल्यांदाच पाहत आहे. हे प्रदर्शन पाहून लष्करात जाण्याची प्रेरणा मिळाली आहे.'

दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, संरक्षण क्षेत्रात नवे नवउद्यमी कशा प्रकारचे काम करतात, कशा प्रकारचे नवसंशोधन झाले आहे, हे या प्रदर्शनात पाहायला मिळते. गेल्या काही वर्षांत भारताने आपल्या क्षमता चांगल्या प्रकारे विकसित केल्या आहेत. लष्करानेही विविध प्रकारच्या यंत्रणा विकसित केल्या आहेत. अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेच्या दृष्टीने भारत आता पूर्णपणे सुरक्षित आहे. जमिनीवरून, आकाशातून किंवा समुद्र मार्गाने कोणताही हल्ला परतवून लावू शकतो, असे सांगून नागरिकांना लष्कराच्या अधिक जवळ नेणे, युवकांना प्रेरणा देणे, त्यांना लष्करासोबत काम करण्यासाठी उद्युक्त करणे हा प्रदर्शनाचा उद्देश असतो.

### मुख्यमंत्र्यांना दोन तास विलंब

» उद्घाटन कार्यक्रमाच्या नियोजित वेळेपेक्षा फडणवीस यांना येण्यास सुमारे दोन तास विलंब झाला. त्यामुळे प्रदर्शन पाहण्यासाठी आलेले नागरिक, मुलांना थांबावे लागले. प्रतीक्षा करून अखेर विविध कसरतींचे सादरीकरण असलेला उद्घाटनाचा कार्यक्रम सुरू करण्यात आला. त्यानंतर नागरिकांना प्रदर्शन पाहण्यासाठी खुले करण्यात आले. फडणवीस आल्यानंतर त्यांनी औपचारिक उद्घाटन केले.

# लोकशाहीवरचा विश्वास अबाधित ठेवण्याची पत्रकारांवर जबाबदारी : डॉ. कोल्हे

## मेघराज भोसले यांच्या हस्ते शबनम न्यूज या वृत्तसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीनंतर लोकशाही प्रणालीवर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. नागरीकरणाच्या समस्या रोज आपल्यासमोर येत आहे, लोकसभा निवडणुकीनंतर एक आश्वासक चित्र निर्माण झाल्याचं लोक म्हणत असताना, विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात अनेक प्रश्न निर्माण झाले. यामुळे लोकशाही प्रणालीवर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत या लोकशाही प्रणालीवर सर्वसामान्यांचा विश्वास अबाधित ठेवण्याची मोठी जबाबदारी पत्रकारांवर असल्याचे शिरूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनी सांगितले. ते पिंपरी चिंचवड शहरात ऑटो क्लस्टर येथे झालेल्या शबनम न्यूज मीडिया ग्रुप प्रस्तुत मेट्रो सिटी आयकॉन पुरस्कार समारंभात बोलत होते.



तसेच पिंपरी चिंचवड शहरात मानाचा समजला जाणारा मेट्रोसिटी आयकॉन पुरस्कार ज्यांना मिळाला आहे त्यांना शुभेच्छा देत पुरस्कारार्थींची आता सामाजिक जबाबदारी वाढली असल्याचे खासदार अमोल कोल्हे यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड शहरातील शबनम न्यूज मीडिया ग्रुप वृत्तसंस्था वतीने दरवर्षी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय कायदा व क्रीडा अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मेट्रो सिटी आयकॉन पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. यावर्षी मेट्रो सिटी आयकॉन २०२४ पुरस्काराचे आयोजन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले ,. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, कामगार नेते शिवसेना उपनेते इरफान सय्यद, राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष यशवंत भोसले, सरिताताई साने सखी मंचच्या अध्यक्षा सरिताताई साने प्रसिद्ध उद्योजक संतोष बारणे, माजी नगरसेविका अनुराधा गोरखे ,अरुण पवार ,आयोजक सौ. शबनम सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते.

शबनम न्यूज मीडिया ग्रुपच्या संस्थापक सौ. शबनम सय्यद यांच्या वतीने आयोजित या पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने मेघराज भोसले यांच्या हस्ते शबनम न्यूज या वृत्तसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

### शबनम न्यूज या वृत्तसंस्थेने विश्वासहर्ता टिकवून ठेवली - भाऊसाहेब भोईर

यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी आपल्या भाषणात सांगितले कि शबनम न्यूज या वृत्तसंस्थेने आपल्या सुरुवातीपासूनच एक विश्वासहर्ता टिकवून ठेवली आहे. जे सत्य आहे ते समाजापर्यंत पोहोचण्याचे काम शबनम न्यूज वृत्तसंस्थेमार्फत होत आहे. अनेक समाज माध्यमे वाढली आहे, जशी लोकसंख्या वाढते तसे न्यूज पोर्टल ही वाढत चालले आहे. परंतु प्रामाणिकपणे काम करत असताना शबनम न्यूज वृत्तसंस्थेने आपलं एक अस्तित्व निर्माण केल आहे. असे भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले.

तसेच यावेळी शिवसेनेचे कामगार नेते इरफान भाई सय्यद, सरिता साने सखी मंचच्या अध्यक्ष सौ सरिता अरुण साने, कामगार नेते यशवंत भोसले, प्रसिद्ध उद्योजक संतोष बारणे यांनी आपापले मनोगत व्यक्त करत सर्वांना शुभेच्छा दिल्या.

### पुरस्काराने सामाजिक कामाची ऊर्जा मोठ्या प्रमाणात निर्माण होते : मेघराज राजेभोसले

» यावेळी मेघराज भोसले म्हणाले की,सामाजिक काम करताना आपल्याला जेव्हा पुरस्कार मिळतो तेव्हा सामाजिक कामाची ऊर्जा मोठ्या प्रमाणात निर्माण होते. तसेच आपली जबाबदारी ही वाढते. शबनम न्यूज मीडिया ग्रुप मार्फत दरवर्षी मेट्रोसिटी आयकॉन पुरस्कार देऊन समाजात चांगले काम करणाऱ्यांची दखल घेतली जाते. याचे आम्हा सर्वांना कौतुक आहे असे अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले यांनी सांगितले.

# सांडपाणी थेट इंद्रायणीत, स्थानिक ग्रामस्थ आक्रमक

## नदीपात्रात मोठ्या प्रमाणात फेस येत असल्याने स्थानिक प्रशासनाबरोबरच महापालिकेवर टीकादेखील करण्यात आली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण विभागाचा दावा ठरला फोल, महापालिकेच्या हद्दीत दोन ठिकाणांवरून प्रक्रिया न केलेले पाणी नदीत, नदी सुधार प्रकल्पासाठी पीएमआरडीएकडून होणार कार्यवाही

इंद्रायणी नदीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. दरम्यान, नदीपात्रात मोठ्या प्रमाणात फेस येत असल्याने स्थानिक प्रशासनाबरोबरच महापालिकेवर टीकादेखील करण्यात आली. मात्र, हा प्रकार पिंपरी-चिंचवड शहरातील नाल्यामुळे तसेच, औद्योगिक पट्ट्यांतील रासायनिक सांडपाण्यामुळे होत नाही, असा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे, तर इंद्रायणीमध्ये थेट सांडपाणी मिसळत असल्याचे दोन ठिकाण असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे महापालिकेचा हा दावा फोल ठरला आहे.



इंद्रायणी नदीपात्रात पांढरा फेस जमा होत आहे. तसेच, पाण्यास मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत आहे. त्यावरून पर्यावरणप्रेमी तसेच, वारकरी संप्रदायातून नाराजी व्यक्त केली जात आहे. यावर नियंत्रण ठेवणारी संस्था म्हणजेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने दिवसेंदिवस प्रदूषणात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे गेल्या आठवड्यात नदीत मृत मासे मोठ्या प्रमाणात आढळून आले होते.

पिंपरी-चिंचवड, चाकण, तळेगाव या औद्योगिक पट्ट्यांतील रासायनिक सांडपाण्यामुळे हा प्रकार घडत असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींकडून केला जात आहे. या घटनेकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ दुर्लक्ष करीत असल्याचे आरोपही होत आहेत.

या संदर्भात महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडे विचारणा केली असता, पिंपरी-चिंचवड शहरातील सांडपाण्यामुळे हे प्रकार घडत नसल्याचा दावा करण्यात आला आहे. सर्व नाले ड्रेनेजवाहिनीद्वारे एसटीपी केंद्रांस जोडण्यात आले आहेत. तसेच, शहरातील औद्योगिक परिसरातील रासायनिक सांडपाणी नदी व नाल्यात मिसळत नसल्याचे स्पष्ट केले

तर, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत चिखली कुदळवाडी या दोन वेगवेगळ्या ठिकाणी सांडपाणी थेट नदीपात्रात मिसळत असल्याचे निदर्शनास आले आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणात कारखाने आहेत. औद्योगिक पट्ट्यातील रसायनयुक्त सांडपाणी नदीपात्रात मिसळत असल्याच्या शंकेला या वस्तुस्थितीमुळे बळकटी मिळाली आहे. त्यामुळे सर्व निर्माण झालेल्या सांडपाण्यावर पालिका प्रक्रिया करते हा महापालिकेचा दावा फोल ठरला आहे. याबाबत महापालिकेने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, चाकण परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत उद्योग व वर्कशॉप निर्माण झाले आहेत. त्यातून प्रक्रिया न करता रासायनिक सांडपाणी नाल्याद्वारे नदीत मिसळत आहे. या प्रकाराचा शोध घेऊन प्रदूषण मंडळाने संबंधित उद्योगांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे

### आढळरावांना पुन्हा डावलले

» इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प राबवण्याबाबत राज्य शासनाकडून पावले उचलल्या सुरुवात केली आहे. त्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळात अखत्यारित असलेले डीपीआर हे राज्य शासनाकडून मागवण्यात आलेले आहे. त्यानुसार मंत्रालयाकडून या प्रकल्पाबाबत सकारात्मक कार्यवाही होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सततच्या वाहतूक कोंडीमुळे कामशेत बाजारपेठेची 'आर्थिक कोंडी'

## अतिक्रमणाच्या विळ्यात अडकल्याने व सततच्या वाहतूक कोंडीमुळे येथील दुकानदारांची आर्थिक कोंडी होत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे ग्रामीण पोलीस दलाच्या अखत्यारित असलेल्या मावळ तालुक्यातील वडगाव, कामशेत, लोणावळा शहर आणि ग्रामीण ही चार पोलीस ठाणी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाला जोडण्याचा प्रस्ताव गृह विभागास पाठविण्यात आला आहे. तो मंजूर झाल्यास आयुक्तालयाच्या हद्दीत वाढ होणार आहे.

पुणे शहर व पुणे ग्रामीण दलाची विभागणी करून १५ ऑगस्ट २०१८ रोजी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यान्वित झाले. त्या वेळी आयुक्तालयाच्या हद्दीत १४ पोलीस ठाणी होती. त्यानंतर चिखली पोलीस ठाणे कार्यान्वित झाले. रावेत, शिरगाव आणि म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे मंजूर झाले. त्यामुळे १८ पोलीस ठाणी होती. दोन महिन्यांपूर्वी वाकड, हिंजवडी, पिंपरी आणि भोसरी या पोलीस ठाण्यांचे विभाजन करून नव्याने अनुक्रमे काळेवाडी, बावधन, संत तुकारामनगर आणि दापोडी पोलीस ठाण्याची निर्मिती करण्यात आली आहे.



आयुक्तालयांतर्गत आता २२ पोलीस ठाणी आहेत. आयुक्तालयाचे एकूण क्षेत्रफळ ११५ चौरस किमी इतके असून, अंदाजे ४० लाख इतकी लोकसंख्या येते. आळंदी-मरकळ, तळवडे, भोसरी, चाकण, हिंजवडी, तळेगाव दाभाडे ही औद्योगिक क्षेत्रे आयुक्तालयाच्या अखत्यारित येतात.

मावळ तालुका हा निसर्गरम्य आणि वेगाने विकसित होणारा भाग म्हणून ओळखला जातो. पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या लोणावळा, कामशेत यांसारख्या ठिकाणी पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. वडगाव आणि तळेगाव दाभाडे परिसरातील औद्योगिक विकासामुळे या भागाचा शहरीकरणाकडे झपाट्याने प्रवास सुरू आहे. मात्र, सद्य:स्थितीत कायदा-सुव्यवस्थेसाठी आवश्यक त्या सुविधा कमी पडत असल्याचे दिसते.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हे आधुनिक सुविधा आणि तंत्रज्ञानाने सुसज्ज असून, वेगवान आणि प्रभावी पोलीस सेवा देण्यात पुढारलेले मानले जाते. मावळमधील देहूरोड, तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाणे पिंपरी-चिंचवड आयुक्तालयांतर्गतच आहेत. आता तालुक्यातील वडगाव, कामशेत, लोणावळा शहर आणि लोणावळा ग्रामीण ही चार पोलीस ठाणीही आयुक्तालयाला जोडण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्याबाबत राज्य शासनाला प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

मावळ तालुक्यातील वडगाव, कामशेत आणि लोणावळा हा परिसर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाला जोडण्याबाबतचा प्रस्ताव गृह विभागाला पाठविण्यात आला आहे. शहर पोलीस दलात अतिरिक्त मनुष्यबळ, अधिकारी-कर्मचारी, आवश्यक साधनसामग्री उपलब्ध असल्याने हा परिसर जोडल्यानंतर येथील

### अतिक्रमण वाहतूक कोंडीचे मुख्य कारण

» बाजारपेठेतील अनेक दुकानदारांची दुकाने रस्त्यावर आली आहेत. रात्रीची वेळ साधून अनेक दुकानदार दुकानाचे समोरील बांधकाम वाढवतात. लहान विटांच्या सहाय्याने दुकान खोल्यांचे तात्पुरते बांधकाम केले जाते. जेणेकरुन भविष्यात अतिक्रमण काढण्याची वेळ आली तरीही नुकसान होणार नाही. अतिक्रमणाचा विषय ऐरणीवर येईपर्यंत या अनधिकृत खोल्यांतून आर्थिक उत्पन्न मिळत राहते. अशा अतिक्रमणांवर वेळीच कारवाई होणे आवश्यक आहे.

### नागरिक म्हणतात...

- पार्किंगची सोय नसल्याने वाहन रस्त्यावर उभे करावे लागते.
- वाहतूक पोलीस कर्मचारी लगेच ऑनलाइन दंड आकारतात.
- दुचाकीवरून खरेदीला गेले तरीही वाहतूक कोंडीत वेळ जातो.
- वेळ व दंड वाचावा यासाठी इतर शहरात जाणे सोइचे ठरते.
- पुलाच्या दोन्ही बाजूस सर्व्हिस रोड हा पार्किंगचे ठिकाण बनलाय.

# सुरक्षित रिक्षाप्रवासाची हमी कोण देणार ? त्रस्त प्रवाशांचा सवाल

## प्रवासी कुणी न्यायचे, यावरून रिक्षाचालकांमध्ये होणारी वादावादी आणि अडवणूक यांमुळे प्रवाशांच्या त्रासात मात्र भर पडत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे रेल्वे स्थानकातून बाहेर पडणारे प्रवासी कुणी न्यायचे, यावरून रिक्षाचालकांमध्ये होणारी वादावादी आणि अडवणूक यांमुळे प्रवाशांच्या त्रासात मात्र भर पडत आहे. याबाबत रेल्वे प्रशासन, शहर वाहतूक पोलीस आणि पुणे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे (आरटीओ) तक्रारी करण्यात आल्या असून, ठोस कार्यवाहीची प्रवाशांची मागणी आहे.

पुणे रेल्वे स्थानकातून प्रवासी बाहेर आल्यानंतर रिक्षाचालकांकडून प्रवाशांच्या भोवती घातला जाणारा गराडा, प्रवासी पुढे जात असला, तरी त्याचा अक्षरशः पाठलाग करून रिक्षात बसण्यासाठी लावला जाणारा तगादा, यामुळे प्रवासी हैराण होत आहेत. त्यातच प्रवासी प्रीपेड रिक्षा केंद्रावर गेलाच, तर तेथे इतर रिक्षाचालकांकडून प्रवाशाला अडवणूक होते, असे चित्र आहे. त्यामुळे नक्की कोणता पर्याय निवडायचा, अशा संभ्रमात प्रवासी पडत असल्याचे दिसून आले आहे.



रेल्वे स्थानकात प्रीपेड रिक्षाचालक संघटना आणि मीटरवरील रिक्षाचालक यांच्यामध्ये मारहाणीच्या घटनाही वाढल्या आहेत. नजीकच्या बंडगार्डन पोलिस ठाण्यात याबाबत १३ ते १४ गुन्हे दाखल झाले आहेत. मध्यंतरी दोन परदेशी तरुणांना मीटरवरील रिक्षाचालकाने अतिरिक्त शुल्क आकारून दूर नेऊन लुटल्याचीही घटना घडली. मीटरवरील रिक्षाचालक प्रवाशांना इच्छितस्थळी सोडल्यानंतर मीटरवरील शुल्कापेक्षा जास्त शुल्काची मागणी करत असल्याच्या तक्रारीदेखील आरटीओ कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत.

'पुणे रेल्वे स्थानकात वाहतूक पोलीस, रेल्वे प्रशासन आणि आरटीओ यांच्या समितीने ठरवून दिलेल्या दरपत्रकानुसार १७ रुपये प्रति किलोमीटर दराप्रमाणे प्रवाशांकडून प्रवासी शुल्क आकारण्यात येत आहे. त्यासाठी विशेष रांग आणि प्रवाशांच्या दृष्टीने सुरक्षितता पुरवण्यात आली आहे. प्रवाशांकडूनही प्रीपेड रिक्षाचा पर्याय निवडला जात आहे. या सुविधेला दिवसेंदिवस प्रवाशांकडून मागणी वाढत असल्याने मीटरवरील रिक्षाचालकांकडून अडचणी निर्माण केल्या जात आहेत,' असा आरोप भारतीय गिग कामगार मंचाचे केशव क्षीरसागर यांनी केला.

> **प्रीपेड रिक्षाचालकांना होणाऱ्या त्रासाबाबत संबंधित संघटनेकडून निवेदन प्राप्त झाले आहे. लवकरच संबंधित रिक्षाचालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी बोलून कार्यवाही करण्यात येईल. प्रवाशांना त्रास देणाऱ्या रिक्षाचालकांवर तातडीने कारवाई करण्याबाबत शहर वाहतूक पोलिसांकडे पत्र पाठविण्यात आले आहे**
>
> **- स्वप्नील भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी**

'रेल्वे स्थानकात सुरू करण्यात आलेल्या प्रीपेड केंद्र सुविधा प्रवाशांच्या आणि रिक्षाचालकांच्या दृष्टीने फायदेशीर आहे. मात्र, गिग कामगार संघटना मीटरवरील रिक्षाचालकांवर दादागिरी करते. त्यामुळे त्यांच्याकडून प्रीपेड रिक्षा केंद्राची जबाबदारी काढून घेण्यात यावी, असे निवेदन स्थानिक पोलीस प्रशासन, आरटीओ, वाहतूक पोलिसांकडे देण्यात आले आहे,' अशी माहिती राष्ट्रवादी रिक्षा संघटनेचे अध्यक्ष विजय रवळे यांनी दिली.

आम्ही फक्त सुरक्षित आणि परवडणाऱ्या रिक्षा सेवेच्या शोधात असतो. तो पर्याय प्रीपेड रिक्षा केंद्रावरून मिळत असल्यास त्याला प्राधान्य असेल. मात्र, रेल्वे स्थानकाबाहेर नेहमीच रिक्षाचालकांचा गराडा आणि वादावादीच्या घटना घडत आहेत. त्यामुळे प्रवाशांना ताटकळत थांबावे लागते

# ओतूर येथे बिबट्या जेरबंद, बाबीत मळा येथे लावला होता पिंजरा

## बिबट्या जेरबंद झाला असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी लहु ठोकळ यांनी दिली

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील बाबीत मळ्यामध्ये वनविभागाकडून लावण्यात आलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी लहु ठोकळ यांनी दिली.

ओतूर येथील बाबीत मळा येथे शुक्रवारी (दि. 3) पहाटे पाच वाजेदरम्यान पिजर्यात बिबट्या जेरबंद झाल्याची माहिती वनविभागाला मिळताच लहु ठोकळ यांच्या मार्गदर्शनाखाली ओतूरच्या वनपाल सारिका बुट्टे, ओतूरचे वनरक्षक विश्वनाथ बेले, उदापूरचे वनरक्षक दादाभाऊ साबळे, किसन केदार, गणपत केदार, फुलचंद खंडागळे, गंगाराम जाधव यांच्या पथकांने तेथे जाऊन सदर बिबट्याला पिंजऱ्यासह ताब्यात घेऊन माणिकडोह बिबट निवारा केंद्र येथे सुखरूप दाखल केले.



बाबीतमळा येथील तुकाराम गीते, गणेश गीते, संस्कार गीते, शुभम गीते, कुणाल गीते, सार्थक गीते, अनिल गीते, पोपट मालकर, दत्ता मालकर, विकास गीते, वैभव आस्वार यांनी ही वनविभाग कर्मचाऱ्यांना यावेळी सहकार्य केले. बिबट ही मादी असून अंदाजे सहा ते सात वर्षे वयाची असल्याची माहिती वनविभागाकडून देण्यात आली.

ओतूर, कपर्दीकेश्वर, बाबीत मळा, पाथरटवाडी, रहाटी या परिसरातील मार्गावर गेली 15 ते 20 दिवसांत तीन ते चार वेळा नागरिकांवर बिबट्याचा हल्ले झाले होते. यामध्ये नागरिक जखमी झाले होते. त्यामुळे वन विभागाला नागरिकांच्या रोशाला सामोरे जावे लागले होते. परिसरातील नागरिकांनी वनविभाग कार्यालयावर मोर्चा नेऊन ठिय्या आंदोलन केले होते.

या पार्श्वभूमीवर बाबीत माळा येथे जेरबंद झालेल्या त्यामुळे काही प्रमाणात का होईना बिबट्याच्या बंदोबस्त झाला आहे. या परिसरात आणखी बिबटे असून ते बिबटे जेरबंद करण्यासाठी वनविभागाने पिंजरे लावले असून इतर उपाययोजना ही चालूच ठेवणार असल्याची माहिती वन विभागाकडून देण्यात आली.

बिबट्याची मादी जेरबंद झाल्याची माहिती मिळताच,ओतूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी लहू ठोकळ यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल सारिका बुट्टे, वनरक्ष क विश्वनाथ बेले,वनरक्षक दादाभाऊ साबळे,वन कर्मचारी फुलचंद खंडागळे, किसन केदार,गणपत केदार,गंगाराम जाधव व स्थानिक ग्रामस्थ तुकाराम गीते, गणेश गीते, संस्कार गीते,शुभम गीते,कुणाल गीते, सार्थक गीते, अनिल गीते, पोपट मालकर, दत्ता मालकर, विकास गीते आदींच्या मदतीने बिबट्याच्या मादीला ताब्यात घेऊन माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात हलविण्यात आले आहे.

याच परिसरात बिबट्याचे वारंवार हल्ले होत आहेत. तसेच येथे उसाचे क्षेत्र व लपन असल्याने बिबट्याचा बछड्यांसह या ठिकाणी वावर असल्याचे येथील नागरिकांनी सांगितले. या परिसरात बिबट्याच्या होणाऱ्या वारंवार हल्ल्याने, येथून दैनंदिन ये-जा करणाऱ्या शालेय विद्यार्थी, महिला व नागरिकांमध्ये अद्यापही भीतीचे वातावरण आहे.